# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

# Agromet Advisory Bulletin

**Date : 19-01-2021**

**Weather Forecast of KATOL Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-01-19(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-01-20 | 0.0 | 31.9 | 16.0 | 58 | 32 | 8.0 | 243 | 0 |
| 2021-01-21 | 0.0 | 32.2 | 13.3 | 44 | 27 | 11.0 | 19 | 0 |
| 2021-01-22 | 0.0 | 30.2 | 12.4 | 29 | 16 | 10.0 | 32 | 0 |
| 2021-01-23 | 0.0 | 30.3 | 12.2 | 26 | 15 | 6.0 | 54 | 1 |
| 2021-01-24 | 0.0 | 30.1 | 13.6 | 31 | 14 | 6.0 | 191 | 0 |

## Weather Summary/Alert:

In Katol block, as per forecast given by, RMC, Nagpur, sky will beclear to partly cloudy and weather will be dry is forecasted.

काटोल तालुक्यामध्ये, प्रादेशिक हवामान केंद्र,नागपूर च्या अंदाजानुसार,पुढील पाच दिवस आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ तसेच हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## General Advisory:

If irrigation water is available, summer groundnut should be sown in the second fortnight of January under Broad bed furrow system and sprinkler irrigation system should be used. Use 125 kg seed per hectare of TAG-24 or SB-11 variety. Seed treatment of Trichoderma 5 gm, Rhizobium 25 gm, and PSB 25 gm should be done per kg of seed.

ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी भुईमुगाची पेरणी जानेवारी च्या दुसऱ्या पंधरवड्यात रुंद वाफा व सरी पद्धतीने तुषार सिंचनाखाली करावी. टीएजी- २४ किंवा एसबी- ११ या जातीचे हेक्टरी १२५ किलो बियाणे वापरावे. प्रती किलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्राम, रायझोबियम २५ ग्राम, पीएसबी २५ ग्राम या जीवाणू संवर्धनाची बीज प्रक्रिया करून पेरणी करावी.

## SMS Advisory:

Farmers are advised to remove cotton stalks out of field after picking ofcotton. Ratooning should be discouraged.

कापसाच्या शेवटच्या वेचणी नंतर झाडे उपटून टाकावीत. कपाशीमध्ये फरदड घेणे टाळावे.

## Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| COTTON | Farmers are advised to remove cotton stalks out of field after picking ofcotton. Ratooning should be discouraged.Picking of cotton should be donepreferably in morning hours. Cotton should be dried in shade and stored atdry place.Store cotton from different pickings separately. Catching pinkbollworm adults in the premises of ginning mills and other storage placesshould be done by the ginning mill owners / godown incharges to reducecarry over in next season. |
| | कापसाच्या शेवटच्या वेचणी नंतर झाडे उपटून टाकावीत. कपाशीमध्ये फरदड घेणे टाळावे. परिपक्व व पूर्ण फुटलेल्याबोंडातील कापूस शक्यतोवर सकाळच्या वेळेत वेचून घ्यावा. वेचलेला कापूस सावलीत वाळवावा व कोरड्या ठिकाणी त्याची साठवणूक करावी. वेगवेगळ्या वेचनीचा कापूस शक्यतोवर वेगळा साठवावा.कापूस गीनिंग मिल आणि इतर कापूस साठवलेल्या जागी मध्ये गुलाबी बोंड अळीचे पतंग कामगंध सापळ्याच्या सहाय्याने पकडून नष्ट करावे. |
| CHICK PEA | Undertake need based irrigation in chickpea crop. Ensure irrigation preferably with sprinkler at pod formation stage for better productivity. Avoid over irrigation/water stagnation to prevent the incidence of root rot.Install pheromone traps (hexalure) @ 5/ha for monitoring the incidence of pod borer (Helicoverpa).Undertake control measures if 8 to 10 adult moths are observed in the trap over 3 consecutive days,. |
| | हरभरा पिकास ओलिताची गरज असल्यास पाणी द्यावे. घाटेअळीच्या सर्वेक्षण व नियंत्रणसाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच २० पक्षी थांबे प्रती हेक्टरी उभारावेत.हरभरा पिकाची पाहणी करावी व हरबरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसताच घाटे अळीने आर्थिक नुकसानाची पतळी (१-२ अळ्या प्रती ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन ५० मि.ली किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन २५ मि.ली किंवा एच.ए.एन.पि.व्हि (१x१०९ पिओबी / प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी) ५०० एल.ई / हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी २० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) |
| CHICK PEA | Due to cloudy weather condition, if there is wilt affected plants observed, uproot it and destroy it immediately. |
| | सद्य परिस्थितील ढगाळ हवामानामुळे जर हरभरा पिकामध्ये मर रोग ग्रस्त झाडांचे निरीक्षण करावे व प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. |
| GROUNDNUT | If irrigation water is available, summer groundnut should be sown in the second fortnight of January under Broad bed furrow system and sprinkler irrigation system should be used. Use 125 kg seed per hectare of TAG-24 or SB-11 variety. Seed treatment of Trichoderma 5 gm, Rhizobium 25 gm, and PSB 25 gm should be done per kg of seed. |
| | ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी भुईमुगाची पेरणी जानेवारी च्या दुसऱ्या पंधरवड्यात रुंद वाफा व सरी पद्धतीने तुषार सिंचनाखाली करावी. टीएजी- २४ किंवा एसबी- ११ या जातीचे हेक्टरी १२५ किलो बियाणे वापरावे. प्रती किलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्राम, रायझोबियम २५ ग्राम, पीएसबी २५ ग्राम या जीवाणू संवर्धनाची बीज प्रक्रिया करून पेरणी करावी. |
| GROUNDNUT | In summer season groundnut variety TAG-24 should be sown at 30 x 10 cm and SB-11 at 30 x 15 or 45 x 10 cm for sowing. |
| | उन्हाळी हंगामात टीएजी- २४ हा वाण ३० x १० सेंमी व एसबी-११ हा वाण ३० x १५ किंवा ४५ x १० सेंमी अंतरावर पेरावा. |
| WHEAT | According to soil moisture status and crop needs, wheat crop should be irrigated at maximum tillering stage (30-35 days after sowing), late jointing (45-50 days after sowing) and flowering stage (65-70 days after sowing) depending on soil moisture and moisture content. |
| | |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | गहू पिकास जमिनीतील ओलावा आणि मगदुर व पिकाची गरज लक्षात घेता पिक अवस्थेनुसार, जास्तीत जास्त फुटवे फुटण्याची अवस्था (पेरणीनंतर ३०-३५ दिवस), कांडी धरण्याची उशिरा अवस्था (पेरणीनंतर ४५-५० दिवस) आणि फुलोरा अवस्था (पेरणीनंतर ६५-७० दिवस) मध्ये असताना सिंचन करावे. |
| WHEAT | If the incidence of pink stem borer is observed in wheat field,foliar spray of quinalphos 25 EC @ 800 ml /acre as soon as pink stem borer is seen. Irrigation also helps in reducing the pink stem borer damage. |
| | गव्हाच्या शेतात गुलाबी रंगाच्या खोड अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी ८०० मिली / एकर या प्रमाणात फवारणी करावी.पिकास ओलीत केल्यास सुद्धा कोड किडीमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होते. |
| WHEAT | In case of infestation of aphids in wheat crop is notice due cloudy weather, spray with Thimethoxam 25% WG @ 10 to 15 gm or Quinalphos 25% EC 40 ml per 10 liters of water for management.In case of infestation of rust and leaf blight disease is notice spraying should be done of Mancozeb 75% WP @ 20 to 25 gm per 10 liters of water. |
| | सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गहू पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी थायमेथोक्झाम २५ % डब्ल्यूजी १० ते १५ ग्राम किंवा क्विनालफॉस २५ % प्रवाही ईसी ४० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| WHEAT | Toxic bait should be used for rat management in wheat crop. To make a poisonous bait, mix 49 parts of cereal flour, a little bit of edible oil and 1 part of bromadiolone 0.25% CB. Spoon the bait into a plastic bag and place it in a live field bin or near the bin. |
| | गहू पिकामध्ये उंदीर व्यवस्थापनासाठी विषयुक्त आमिषाचा वापर करावा. विषयुक्त आमिष तयार करण्यासाठी धान्याचा भरडा ४९ भाग, थोडे गोडे तेल व १ भाग ब्रोमाडीओलोन ०.२५ % सीबी एकत्र मिसळावे. चमचाभर आमिष प्लास्टिकच्या पिशवीत टाकून शेतातील जिवंत बिळामध्ये टाकावे किंवा बिलाजवळ ठेवावे. |
| PIGEON PEA (RED GRAM/ARHAR) | Carry out harvesting, threshing and safe storage of matured Arhar crop sown on timely or early. |
| | वेळेवर किंवा लवकर पेरणी केलेल्या परिपक्व झालेल्या तूर पिकाची काढणीवमळणी ची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| TOMATO | In the view of present cloudy, if tomato leaf blight was noticed, spraying should be taken of Mancozeb 75 WP 25 gms or Copper oxychloride 50 WP 25 gms mix with in 10 liters of water. For control of thrips and white fly on tomato crop, spraying should be taken of Thimethoxam 25% WG 4 gm or Dimethoate 30% EC in 10 ml per 10 liters of water. For management of tomato fruit borer spraying should be taken quinalphos 25 EC 20 ml in 10 litre of water. |
| | सद्यस्थितीत ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५ डब्लूपी. २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी. २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## Horticulture Specific Advisory:

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| ORANGE | For orange fruit trees as per needs of crop the water requirement is 7-30, 44-72, and 82-102 litres per day for tree of age 1-4, 5-7, 8 years old and above, respectively should be met with drip system. Use double ring method if there is no drip system. |
| | संत्रापिकाच्या झाडाच्या गरजेनुसार आवश्यकता भासल्यास ठिबक संच असल्यास १ ते ४, ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे ७ ते 30, ४४ ते ७२ आणि ८२ ते १०२ लिटर प्रती दिवस जमिनीनुसार पाणी द्यावे. ठिबक संच नसल्यास दुहेरी आळे पद्धतीने ८ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. |
| ORANGE | Infestation of citrus pyslla occurs with the outburst of new leaves in Ambia bahar. The pest can cause 100 per cent flower drop if not controlled. The pest causes “die back” and “Greening” disease in affected trees causing “slow decline”. It can be controlled by spraying Dimethoate 2 ml or Acephate 2 g or Imidacloprid 0.5 ml per litre water at bud burst stage. Second spray should be carried after 10 days interval. Change the pesticides in subsequent sprays. |
| | फळ बागेमध्ये पाणी दिल्याबरोबर ताण तुटतो व नवीन पालवी किंवा नवतीची सुरुवात होते. या वेळी सिट्रस सिला व त्याची पिल्ले पानातील रस शोषून घेतात. नवतीच्या पानाची गळ होऊन फांद्या सुकतात व फळधारने वर अनिष्ठ परिणाम होतो. ह्या किडीद्वारे “ग्रीनींग” या रोगाचा प्रादुर्भाव होतो. या किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट २ मिली किंवा एसिफेट २ ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी. दुसरी फवारणी १० दिवसानंतर कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. |
| MANGO | Due to continuous cloudy weather, infestation of Jassids on mango trees and spraying of chemical pesticides is required for management, Buprofezin 25 % SC 10 ml or Deltamethrin 2.8 EC 5 ml or Imidacloprid 17.8 % SL 4 ml or Lambda cyhalothrin 5 % EC 5 ml or Methyl demeton 25 EC 10 ml or Dimethoate 30 EC 16.5 ml per 10 liters of water and spraying should be done on stems, branches, tops and inflorences of mango. |
| | सततच्या ढगाळ हवामानामुळे आंब्याच्या झाडावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि रासायनिक कीटक नाशकाच्या फवारणीची गरज भासल्यास व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % SC १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % EC ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लँबडा सायहॅलोथ्रिन ५ % प्रवाही ५ मिली मिथाइल डिमेटोन २५ % प्रवाही १० मिली किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण खोडावर, फांद्यावर, शेंड्यावर आणि मोहोरावर फवारावे. |
| BRINJAL | In the view of present cloudy, if the incidence of top shoot and fruit borer spraying should be taken of cypermethrin 25 % EC 30 ml in 10 litre of water for management. |
| | सद्यस्थितीत ढगाळ हवामानामुळे वांगी पिकावर शेंडे आणि फळे पोखरणाऱ्या अळी च्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## Live Stock Specific Advisory:

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| GOAT | In case of infestation ofticks and fleason the body of goats and goats kids, rub the goats and kids with equal quantity of ash and 50% Carbaryl powder. In case of high incidence, add 2 ml of Butox (Deltamethrin 12.5 mg) or Amitraz and bathe the goats and kids. Pesticides should be used very carefully and care should be taken not to poison the goats by licking them. |
| | |

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| | शेळ्यांच्या करडा च्या अंगावर गोचीड पिसावांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास करडांना समप्रमाणात राख व ५० % कार्बारील पावडर मिसळून अंगावर चोळावी. जास्त प्रादुर्भाव असल्यास २ मिली ब्यूटोक्स किंवा अमित्राझ औषध टाकून शेळ्या व करडांना अंघोळ घालावी. कीटक नाशकाचा वापर अतिशय सावधपणे करावा व करडांना चाटून विषबाधा होणार नाही याची काळजी घ्यावी. |

**Poultry Specific Advisory:**

| Poultry(Varieties) | Poultry Specific Advisory |
|---|---|
| BIRD | Don’t handle dead birds with bare hands. Dispose of the dead birds carefully under the guidance of local veterinarians, either by burning or burying in a pit. While disposing them of, one must wear mask, gloves and safety goggles. If gloves not available, use an inverted polythene bag & wash your hands after the disposal. Open water troughs or farm tanks must be covered in order to avoidthe fecal contamination by wild or migratory birds. Trees in the farm or near its boundary should be pruned. Other measures include maintaining poultry farm sanitation and avoiding introduction of birds of unknown disease status. |
| | बर्ड फ्लू रोगाच्या पार्श्वभूमीवर उघड्या हातांनी मृत पक्षी हाताळू नका. स्थानिक पशुवैद्यांच्या मार्गदर्शनाखाली मृत पक्ष्यांची काळजीपूर्वक विल्हेवाट खड्ड्यात जाळावे किंवा जमिनीत गाडावे. त्यांची विल्हेवाट लावताना एखाद्याने मास्क, ग्लोव्ह्ज आणि सेफ्टी गॉगल घालावे. हातमोजे उपलब्ध नसल्यास, उलटलेली पॉलिथीन पिशवी वापरा आणि विल्हेवाट लावल्यानंतर आपले हात धुवा. वन्य किंवा स्थलांतरित पक्ष्यांद्वारे मलमार्गाचा संसर्ग टाळण्यासाठी खुल्या पाण्याचे कुंड किंवा शेतातील टाक्या झाकाव्यात. शेतात किंवा त्याच्या सीमेजवळील झाडांची छाटणी करावी. इतर उपायांमध्ये पोल्ट्री फार्मची स्वच्छता राखणे आणि अज्ञात रोग स्थितीतील पक्ष्यांचीनवीन संगोपन टाळावे. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation)(Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |